## :: नियमीत दि. दावा क्रं.२३१/२०२१ मधील नि. क्रं.११ खालील आदेश ::
## ( विनायक वगैरे..वि.. राजकुमार वगैरे )

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकत भुमी अभिलेख कार्यालय, देवणी यांच्यामार्फत मोजणी करुन हद्दीच्या खुणा निश्चित करण्याकरीता दाखल केला आहे.

०२. वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने कायमचा मनाई हुकूम मिळणेसाठी व जमीनीची मोजणी होवून हद्दी कायम करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीने वादीची ७/१२ वरील मालकी नाकारलेली आहे. तसेच सामाईक बांध फोडल्याचे अमान्य केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये वादीच्या मालकी क्षेत्राची मोजणी करुन खुणा कायम करणे उचीत व न्यायाचे आहे. मोजणी झाल्यास वाद प्रश्न कायमचा संपुष्टात येणार आहे. वादी मोजणी फि भरण्यास तयार आहे. सबब, दावा मिळकतीची तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, देवणी यांच्या मार्फत मोजणी करुन खुणा कायम करुन व तसा अहवाल सादर करण्याचे निर्देश देणे बाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीनी सदच्या अर्जाला विरोध केला की, केवळ पुरावा हस्तगत करण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. वादीने दाव्यात कोठेही नमुद केलेले नाही की, प्रतिवादी यांनी त्यांच्या जमीनीवर किती क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. तसेच वादीच्या दाव्यास प्रतिवादी केवळ अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत हे मोघम कारण दाखवून वादी आज रोजी केवळ पुरावा हस्तगत करण्याकरिता सदरचा अर्ज दिलेला आहे. करिता वादीचा अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. वादीने सदरचा दावा कायमस्वरुपी मनाई तसेच हद्दीच्या खुणा निश्चित करुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वाद हा जमीनच्या हद्दीच्या खुणा संदर्भात असल्याने व प्रतिवादीने वादीच्या हद्दीच्या खुणा नाकारल्यामुळे जमीनीची मोजणी करणे उचीत होईल. तसेच दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असल्यास तीही बाब मोजणीव्दारे स्पष्ट होईल. दावा मिळकतीची मोजणी केल्यास वस्तुस्थितीबाबत अधिक स्पष्टता न्यायालयासमोर येईल व प्रस्तुतचा दावा गुण दोषावर निकाली होण्यास मदत होईल. हद्दीच्या खुणा निश्चित करणे तसेच अतिक्रमण झाले

असल्यास ते नेमके किती आहे ही बाब केवळ मोजणीआधारे शाबीत होवू शकते. त्यामुळे प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार मोजणी केल्यास वादीच्या बाजूने पुरावा गोळा होईल असे वाटत नाही. उलट वस्तुस्थितीबाबत स्पष्टता येईल. सबब, दावा मिळकतीची मोजणी करणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करणे न्यायोच्चीत आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**:: आ दे श ::**

१) अर्ज मंजूर करण्यात आला.

२) तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, देवणी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात येत आहे.

३) तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, देवणी यांनी किंवा त्यांच्या वतीने पात्र अधिकारी यांनी मौजे हेळंब ता. देवणी येथील जमीन भु. मा. क्रं.३२/१ याची संपूर्ण मोजणी करुन वादीची हद्द स्वतंत्रपणे निश्चित करावी.

४) जमीन भु. मा. क्रं.३२/१ याची मोजणी निश्चित असलेल्या हद्दीपासून करावी व वादीचे क्षेत्र स्वतंत्रपणे मोजणी करुन त्यामध्ये अतिक्रमण आढळल्यास, प्रत्येक धारकाचे अतिक्रमाणे स्वतंत्रपणे दाखवावे.

५) मोजणीचा अहवाल नकाशासोबत भु. मा. क्रं.३२/१ मधील प्रत्येक धारकांचे ७/१२ उता–यावरील क्षेत्र अथवा ८–अ मधील क्षेत्र व प्रत्यक्ष ताब्यातील क्षेत्र याचा उल्लेख मोजणी नकाशावर करावा.

६) मोजणी अहवाल नकाशासोबत दि. ०७/०६/२०२३ पर्यंत दाखल करण्यात यावा.

७) मोजणीचा खर्च वादींनी सोसावा.

स्वाक्षरी/–

( ए. पी. खोल्लम )

दि. २०/०३/२०२३. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

**दे व णी**.